**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८९/२०१४</u>**

## निशाणी १२७ खालील आदेश

प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज हा प्रतिवादीतर्फे साक्षीदार दिवाकर प्रभु यांचा उलटतपास घेण्याचा वादी यांचा अधिकार संपुष्टात आला, असा दि.०७.०७.२०२५ रोजी न्यायालयाने केलेला आदेश रद्द करण्याबाबत व वादी यांना सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळावी म्हणून सादर केला आहे.

**०२.** वादी यांचे असे कथन आहे की, साक्षीदार दिवाकर प्रभु हे मागील तारखेला न्यायालयात हजर होते, परंतु ते आजारी असल्यामुळे त्यांना मुंबई येथून येणे शक्य झाले नाही. वादींना सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी न दिल्यास त्यांचे पैश्याच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास न घेण्यामागे वादीचा कोणताही हेतु किंवा निष्काळजीपणा नव्हता.

**०३.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दिले की, सदरचा अर्ज हा खोटा व खोडसाळ असून केवळ केसच्या चौकशीचे काम लांबणीवर पडावे या हेतूने दिला आहे. सबब, केवळ अर्जदार उपस्थित नव्हता हे कारण पुरेसे नाही. त्यांचे वकील उलटतपास घेऊ शकत होते. सबब, सदरचा अर्ज हा मंजूर करावयाचा झाल्यास योग्य ती कॉस्ट लावून मंजूर करण्याची विनंती केली.

**०४.** याबाबत काही दुमत नाही की, वादीकरीता साक्षीदार दिवाकर प्रभु यांच्या उलटतपासाची संधी दि.०७.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये संपुष्टात आली. प्रतिवादी तर्फे दिवाकर प्रभु यांच्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दि.३०.०९.२०२४ रोजी सादर केले आहे. यावरुन असे दिसून येते की, वादींनी जवळपास दहा महिन्याच्या कालावधीमध्ये सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही. त्यामुळे शेवटी दि.०७.०७.२०२५ रोजी उलटतपास नाहीचा आदेश करावा लागला. सदर आदेश होवूनसुध्दा एका महिन्याच्या विलंबाने प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज सादर केला आहे. मागील तारखेचा रोजनामा पाहिल्यास वादी हजर होते असे दिसून येते, परंतु त्यावेळी त्यांनी कोणताही अर्ज दिलेला नाही. तसेच अर्जातील कारण न पटण्यासारखे आहे. असे असले तरीही नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींना वादीचा उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित ठरेल. वादी यांनी साक्षीदार दिवाकर प्रभु यांचा उलटतपास घेण्यास केलेल्या विलंबाबाबत योग्य ती कॉस्ट लावून वादी यांना नुकसान भरपाई म्हणून देणे आवश्यक आहे. करिता,

खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज **निशाणी १२७** वादी यांनी प्रतिवादीला रु.५००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी वरील अटीची पुर्तता विनाविलंब करावयाचे आहे व त्यानंतर दि.०७.०७.२०२५ चा विना उलटतपासचा आदेश रद्द करण्यात येऊन साक्षीदार दिवाकर प्रभु यांचा उलटतपास घेण्याची संधी देण्यात येईल.

CHAVAN SANJAY MOTIRAM

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2025.08.12 13:26:02 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी

**दिनांकः ०८.०८.२०२५**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No.89/2014 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Smt. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC Court, Khed. |
| Date of Decision | : | 08.08.2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 08.08.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 12.08.2025 |